REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
IMPACT FACTOR : 3.8014 (UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 5 | FEBRUARY – 2017

# वर्धा जिल्हयातील जैविक खतांचा वापर, विपणन व शासकीय प्रोत्साहन: एक अध्ययन

प्रा. भास्कर जे. वाळके
लोक महाविद्यालय, जि. वर्धा.

## सारांशं

भारतीय हरित क्रांतीच्या कालावधीत सुधारित बि–बियाणे रासायनिक खते व विविध प्रकारची किटकनाशके फवारून उत्पादनात वाढ झाली हे जरी खरे असले तरी त्यामुळे जमीन, पाणी, हवा इत्यादीचे प्रदुषण मोठ्या प्रमाणात वाढले आणि त्यामुळे जमिनीची सुपिकता नष्ट होऊन बहुतांश पिकांचे उत्पादन खुप मोठ्या प्रमाणात घटले या परिस्थितीत जर आपल्याला पीकांची उत्पादकता वाढवुन प्रदुषण कमी करावयाचे असेल तर जैविक शेतीकडे



वळणे गरजेचे आहे. किंबहुना या सर्व प्रश्नावर जैविक शेती हा एक उपाय आहे. जैविक शेतीतील सर्व उत्पादने ग्राहकांच्या पसंतीस आली आणि जैविक शेती मालाची गरज आज देशभरात आणि महाराष्ट्रात वाढत आहे हे लक्षात घेवून हा संशोधन विषय निवडला आहे.

## प्रस्तावना

१९६० च्या दशकात भारतात हरितक्रांती होवून आधुनिक पद्धतीची शेती करण्यास सुरुवात झाली. या शेतीमध्ये वापरण्यात येणाऱ्या निविष्टा उदा. विविध खते, किटकनाशके, संजीवके इत्यादी. रासायनिक घटकांवर भर दिला गेला. रासायनिक शेतीचा भर भरपुर खते, मुबलक पाणी, किटकनाशकांचा अतिरिक्त वापर, संकरित बियाणे असा होता. या पद्धतीमुळे जमिनीची सुपिकता नष्ट झाली. पर्यावरणाचा ऱ्हास झाला. जैवविविधता नष्ट झाली. पृथ्वीचे तापमान वाढून तिचे अस्तित्व धोक्यात आले. विषयुक्त अन्नग्रहन केल्यामुळे मानवाचे मानसीक आणि शारिरीक आरोग्य धोक्यात आले आहे. कर्करोग, मधुमेह, हृदयविकार, मुत्रविकार अशा अनेक व्याधींनी आज मानवाचे जीवन धोक्यात आले.

या सर्वांवर मात करण्यासाठी भविष्य काळात भारतीय लोकांचे जीवन सुखी करण्यासाठी तसेच आपली पृथ्वी, शेती आणि पर्यावरण वाचवण्यासाठी जैविक शेती हा एक उत्तम उपाय आहे. जैविक शेती मध्ये जैविक खंताचा वापर होतो. याच बरोबर जीवाणू खतदेखील एक महत्त्वपूर्ण विकल्प आहे. जैविक खते बाजारात किती प्रमाणात उपलब्ध आहे? जैविक खते वापरण्याची जागरूकता शेतकऱ्यांमध्ये आहे किंवा नाही? जैविक खतांचा वापर शेतकरी कोणत्या पद्धतीने करतात? मुख्यत्वे कुठल्या प्रकारच्या पिकाकरिता करतात? जैविक खत उत्पादकांची विपणन पद्धती कोणत्या प्रकारची आहे? शासनाद्वारे जैविक खत उत्पादन व विक्रीकरिता काही प्रोत्साहन देण्यात येते काय? तसेच जैविक खत विपणनाकरिता शासकीय माध्यमाची मदत होते काय? या व इतर संबंधीत मुद्यांचे उत्तरे शोधण्याकरिता प्रस्तुत संशोधन विषय निवडण्यात आला आहे.

रासायनिक खतांमुळे शेती ही विषयुक्त झाली आहे. विविध प्रकारची खते व औषधे अन्नसाखळीत मिसळून संपूर्ण मानवजातीचे आरोग्य धोक्यात आले आहे. रासायनिक शेतीतून उत्पादीत केलेला भाजीपाला, धान्य, फळे खाऊन आज संपुर्ण जगात कॅन्सर सारख्या व्याधींचे प्रमाण वाढत आहे. हे सर्व टाळण्यासाठी जैविक शेतीचा सखोल अभ्यास करणे, अत्यंत गरजेचे आहे. सेंद्रिय शेतीमूळेच शाश्वत विकासाचे उद्दिष्ट गाठता येऊ शकते. जैविक शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी शेतकऱ्यांदरम्यान जागरूकता वाढविणे अत्यंत गरजेचे आहे कारण शेती उत्पादनात जैविक खतांचे महत्व समजल्याशिवाय जैविक शेतीची वाढ होणार नाही. जैविक शेतीमुळे आपण आपल्या पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करू शकतो. अशा प्रकारच्या शेती पद्धतीने नैसर्गिक स्त्रोताचे पुढच्या पिढीसाठी जतन करता येईल. सेंद्रिय शेतीचा अभ्यास शेतकऱ्यांना व्यापारीदृष्टचा व आर्थिकदृष्टचा शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरू शकतो. जैविक शेत मालाला स्थानिक आणि जागतिक बाजारपेठेला मागणी वाढत आहे. वरील बाबींच्या दृष्टिकोनातून जैविक खतांचा वापर, विपणन व शासकीय प्रोत्साहन यांचा अभ्यास करणे अत्यंत महत्त्वपूर्ण व गरजेचे आहे.

### सारणी क्रमांक १: सध्याच्या काळात जैविक खतांचा वापर व लोकप्रीयतेत वाढ होत असण्यासंबंधी प्रतिक्रिया

| सध्याच्या काळात जैविक खतांचा वापर व लोकप्रीयतेत वाढ | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ४२ | ८४ |
| नाही | ८ | १६ |
| एकूण | ५० | १०० |

**वरील सारणी क्रमांक १** मध्ये सध्याच्या काळात जैविक खतांचा वापर व लोकप्रीयतेत वाढ होत असण्यासंबंधी उत्तरदात्याची प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहेत. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ८४ टक्के उत्तरदात्यांना जैविक खतांचा

सध्याच्या काळात वापर व लोकप्रीयतेत वाढ होत आहे असे वाटते तर १६ टक्के उत्तरदात्यांना असे वाटत नाही. वरील सारणीतील विश्लेषणावरून असे दिसून येते की, बहुतांश उत्तरदात्यांना सध्याच्या काळात जैविक खतांचा वापर व लोकप्रीयतेत वाढ होत आहे असे वाटते.

### सारणी क्रमांक २ : वाढत्या लोकप्रीयतेमुळे जैविक खतांची मागणी बाजारात वाढली असण्यासंबंधी उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया

| वाढत्या लोकप्रीयतेमुळे बाजारात जैविक खतांची वाढती मागणी | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ३८ | ७६ |
| नाही | १२ | २४ |
| एकूण | ५० | १०० |

उपरोक्त **सारणी क्रमांक** २ मध्ये वाढत्या लोकप्रीयतेमुळे जैविक खतांची मागणी बाजारात वाढली असण्यासंबंधी उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहेत. सारणीत दर्शविलेल्या प्रतिक्रियांनुसार ७६ टक्के उत्तरदात्यांना वाढत्या लोकप्रीयतेमुळे जैविक खतांची मागणी बाजारात वाढली आहे असे वाटते तर २४ टक्के उत्तरदात्यांना असे वाटत नाही. वरील माहितीवरून बहुतांश उत्तरदात्यांना असे वाटते की, वाढत्या लोकप्रीयतेमुळे जैविक खतांची मागणी बाजारात वाढली आहे.

### सारणी क्रमांक ३ : जैविक खतांच्या मागणीत झालेल्या अंदाजे वाढसंबंधी उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया

| जैविक खतांच्या मागणीत अंदाजे वाढ | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| १ ते १० टक्के | ६ | १५.८ |
| ११ ते २० टक्के | ७ | १८.४ |
| २१ ते ३० टक्के | १९ | ५०.० |
| ३० टक्क्यांपेक्षा अधिक | ६ | १५.८ |
| एकूण | ३८ | १०० |

**सारणी क्रमांक ३** मध्ये जैविक खतांच्या मागणीत झालेल्या अंदाजे वाढसंबंधी उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहेत. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ५० टक्के उत्तरदात्यांच्या मते जैविक खतांच्या मागणीत अंदाजे २१ ते ३० टक्के वाढ झाली असून जैविक खतांच्या मागणीत ११ ते २० टक्के, ३० टक्क्यांपेक्षा अधिक व १ ते १० टक्के अंदाजे वाढझाली असल्याचे नमुद करणाऱ्या उत्तरदात्यांची टक्केवारी अनुक्रमे १८.४ टक्के व प्रत्येकी १५.८ टक्के होती. सारणीतील विश्लेषणावरून असे निदर्शनास येते की, बहुतांश उत्तरदात्यांना जैविक खतांच्या मागणीत अंदाजे २१ ते ३० टक्के वाढ झाली आहे असे वाटते.

**सारणी क्रमांक १: बाजारातील जैविक खतांची मागणी पुर्ण करण्याच्या प्रमाणासंबंधी उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया**

| बाजारातील जैविक खतांची मागणी पुर्ण करण्याचे प्रमाण | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| २५ टक्क्यां पर्यंत | १६ | ३२ |
| २६ ते ५० टक्के | २२ | ४४ |
| ५१ ते ७५ टक्के | ८ | १६ |
| ७६ ते ९९ टक्के | ३ | ६ |
| १०० टक्के | १ | २ |
| एकूण | ५० | १०० |

उपरोक्त **सारणी क्रमांक १** मध्ये बाजारातील जैविक खतांची मागणी पुर्ण करण्याच्या प्रमाणासंबंधी उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहेत. सारणीत दर्शविलेल्या प्रतिक्रियांनुसार ४४ टक्के बाजारातील जैविक खतांची २६ ते ५० टक्के मागणी पूर्ण करीत असून बाजारातील जैविक खतांची २५ टक्क्यां पर्यंत, ५१ ते ७५ टक्के, ७६ ते ९९ टक्के व १०० टक्के मागणी पूर्ण करणाऱ्या जैविक खतांची टक्केवारी अनुक्रमे ३२ टक्के, १६ टक्के, ६ टक्के व २ टक्के असल्याचे दिसून आले. वरील विश्लेषणावरून असे निदर्शनास येते की, बहुतांश बाजारातील जैविक खतांची २६ ते ५० टक्के मागणी पूर्ण करतात.

## निष्कर्ष

वरील विश्लेषणावरून असे निदर्शनास येते जैविक खतांची सध्याच्या काळात लोकप्रीयतेत वाढ होत आहे असे वाटते व वाढत्या लोकप्रीयतेमुळे खतांची मागणी बाजारात वाढली आहे. जैविक खतांची मागणीत अंदाजे २१ ते ३० टक्के वाढ झाली आहे तसेच बाजारात जैविक खतांची २६ ते ५० टक्के मागणी पूर्ण होत आहे.

## संदर्भ ग्रंथसूची


१) डॉ. आगलावे प्रदीप संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे विद्या प्रकाशन, नागपूर १ जाने.२०००

२) डॉ. भांडारकर पु.ल. सामाजिक संशोधन पद्धती महाराष्ट्र विद्यापीठ ग्रथनिर्मीत मंडळ, नागपुर. तृतीय आवृत्ती १९८७

३) डॉ. संत दु. का. संशोधन पद्धती, प्रक्रिया व अंतरंग पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन पुणे द्वितीय आवृत्ती जुलै – १९८८

४) डॉ. नाडगोंडे गुरूनाथ सामाजिक संशोधन पद्धती फडके प्रकाशन कोल्हापूर द्वितीय आवृत्ती ऑक्टो.१९९९

५) डॉ. जरारे विजय एल. समाजिक शास्त्रीय संशोधन प्रणाली अद्वैत प्रकाशन, अकोला २२ ऑक्टो.२००४

६) प्रा. घाटोळे रा. ना. समाजशास्त्रीय संशोधन तत्वे आणि पद्धती मंगेश प्रकाशन, नागपूर पाचवी आवृत्ती १९९२
७) डॉ. बोरूडे रा .र. संशोधन पद्धतीशास्त्र पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन सप्टें.२००५
८) मोमिन समिना महमदशफी (२०१२), केळी उत्पादन व विपणन खर्चाचा विश्लेषणात्मक अभ्यास.
९) नवले राजश्री., (२०१४), आधुनिक विपणनात ग्राहक न्यायालयाची उपयुक्तता एक चिकित्सक अभ्यास.
१०) ससाने. पी. ए., (२०१५), मावळ तालुक्यातील जिरायती सिमांत शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास.
११) घाडगे ज्यातीराम, (२०१२), जिरायती व बागायती भागातील प्राथमिक कृषी पतसंस्था तुलनात्मक अभ्यास.
१२) घोडके दत्तात्रय., (२०१६), पिक विमा योजनेचे शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक विकासातील योगदान
१३) गाढे, नारायण, (२०१४), मका उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक आणि सामाजिक अध्ययन
१४) बोरसे समाधान, (२०१४)., “Economic benefit of Organic farming since.